नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १९/०३/२०२४ (मंगळवार) सायंकाळ**

---

## अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

### —: नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दिनांक १८/०३/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे कन्हान उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना गोपनिय मुखबिरकडुन माहिती मिळाली की, पो.स्टे. कन्हान हद्दीत खदान नंबर ०६ येथे एका इसमाने आपल्या राहते घरी अवैध अग्नी शस्त्र बाळगलेले आहे. अशा माहितीवरून यातील **आरोपी नामे—** रवी काशीराम गोंड उर्फ धुर्वे वय ३० वर्ष, रा. खदान नंबर ०६ कन्हान यास ताब्यात घेऊन यांच्या राहते घराची झडती घेतली असता त्याचे घराच्या बाजूने असलेल्या बकरीच्या गोठयामध्ये ड्रमच्या मागे लपवुन ठेवलेला एक देशी बनावटीचे लोखंडी हॅन्ड लेट अग्निशस्त्र मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून देशी बनावटीचे लोखंडी हॅन्ड लेट अग्निशस्त्र किंमती ४००००/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर हत्यारा बाबत आरोपीला परवाना विचारला असता त्याच्या जवळ कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे मिळुन आले नाही. जप्त मुद्देमाल व कागदपत्रे पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे कन्हान यांचे ताब्यात देवून आरोपी विरूद्ध कलम ३/२५ भा.ह.का, १८८ भादंवि १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. हर्ष पोद्दार पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण, श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक बट्टूलाल पांडे, सफौ नाना राऊत, पो.हवा विनोद काळे, इक्बाल शेख, प्रमोद भोयर, पोना संजय बरोदिया, चालक पोहवा मुकेश शुक्ला यांनी केली.



## नागपूर ग्रामीण पोलीसांचा रूटमार्च

पोलीस स्टेशन भिवापूर अंतर्गत आज दिनांक १९/०३/२०२४ रोजीचे १३/३० ते १५/३० वा. पर्यंत आगामी लोकसभा निवडणूक व आगामी सण उत्सव होळी, शिवजयंती संबंधाने भिवापूर शहर व नांद येथे रूटमार्च घेण्यात आला. रूट मार्च दरम्यान पोलीस स्टेशन भिवापूरचे सपोनी श्री जयप्रकाश निर्मल ठाणेदार यांचे मार्गदर्शनात ०२ अधिकारी, अंमलदार ११, ०६ होम सैनिक, रेल्वे पोलीस फोर्सचे ०१ अधिकारी १९ कर्मचारी असे एकूण ०३ अधिकारी ,३० पोलिस अंमलदार व ०६ होम सैनिक रूट मार्च करिता हजर होते.







पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर